# हवामान आधारित कृषि सल्ला

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र , मोहोळ , सोलापूर.

दूरध्वनी –(०२१८९) २३३००१ ईमेल-damu.kvkmohol@gmail.com

### (३१२) हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दिनांक २६/०५/२०२३

| मागील आठवडयातील हवामान (दि २०.०५.२०२३ ते २६.०५.२०२३ | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (दि.२७.०५.२०२३ ते ३१.०५.२०२३) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | दिनांक | २७ | २८ | २९ | ३० | ३१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | -- | पाऊस (मि. मी.) | ०० | ०० | ०० | ७.० | ५.० |
| ४४.० | ४४.८ | ४३.१ | ४३.३ | ४१.९ | ४०.४ | -- | कमाल तापमान (अं. से.) | ३९.० | ३९.० | ४०.० | ४१.० | ४२.० |
| २८.९ | २८.६ | ३०.३ | २९.६ | २८.१ | २७.२ | -- | किमान तापमान (अं. से.) | २३.० | २२.० | २३.० | २४.० | २४.० |
| अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | -- | ढग स्थिति (आकाश ) | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ | अंशतः ढगाळ |
| ४५ | ५१ | ५७ | ५० | ५१ | ६० | -- | सकाळची सापेक्ष आद्रता (%) | ६८ | ६५ | ६५ | ७० | ७५ |
| २७ | ३१ | ४३ | ३६ | ४४ | ३५ | -- | दुपारची सापेक्ष आद्रता (%) | ४१ | ३४ | ३८ | ३९ | ४० |
| ४.० | २.० | ४.० | २.० | ३.० | ४.० | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | २७.० | २५.० | १९.० | १६.० | १८.० |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

<table>
<tr><th>पीक</th><th>अवस्था</th><th>कृषि विषयक सल्ला</th></tr>
<tr><td colspan="2">हवामान सारांश</td><td>भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र,मुंबई यांचे कडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सोलापूर जिल्ह्यामध्ये दिनांक २६ मे २०२३ ते ३१ मे २०२३ दरम्यान आकाश अंशतः ढगाळ राहील. दिनांक २६ मे २०२३ ते २९ मे २०२३ दरम्यान हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. तर दिनांक ३० आणि ३१ मे २०२३ रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.<br>कमाल तापमान ३९ अंश सेल्सिअस ते ४२ अंश सेल्सिअस पर्यंत तर किमान तापमान २२ ते २४ अंश सेल्सिअस पर्यंत राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ६५ ते ७५ % तर दुपारची सापेक्ष आद्रता ३८ ते ४१ % दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी १६.० किमी ते २७.० किमी पर्यन्त राहण्याची शक्यता आहे.<br>ईशारा : भारतीय हवामान खात्याच्या प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्या अंदाजानुसार सोलापूर जिल्ह्यात दिनांक २९, ३० मे २०२३ रोजी तुरळक ठिकाणी वादळी वारा (३० ते ४० कि.मी./तास), मेघगर्जना, विजांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे .</td></tr>
<tr><td colspan="2">विस्तारित श्रेणी अंदाज (ईआरएफएस)</td><td>विस्तारीत अंदाजानुसार (ईआरएफएस )मध्य महाराष्ट्रात विभागात (सोलापूर,धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर)<br>दिनांक ३१ मे २०२३ ते ०६ जून २०२३ दरम्यान<br>पाऊस सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे.<br>कमाल तापमान सरासरी राहण्याची शक्यता आहे.<br>किमान तापमान सरासरी राहण्याची शक्यता आहे.</td></tr>
<tr><td colspan="2">सामान्य सल्ला</td><td>➢ खरीप नियोजनकरिता पेरणी पूर्व कामे सुरू करावीत ( उगवण क्षमता तपासणे , जमिनीतील अन्नद्रव्य तपासणे दर्जेदार व प्रमाणित बियाणाचे नियोजन करणे, मशागतीची कामे करणे)<br>➢ काढणी झालेल्या पिकांची मळणी करून सुरक्षीत ठिकाणी साठवणूक करावी .<br>➢ पाऊसापासून बचावासाठी उघडयावरील धान्य सुरक्षित स्थळी हलवावे.<br>➢ शेतकरी बंधूंनी स्वताःकडे सोयाबीन बियाणे उपलब्ध असल्यास बियाण्याची उगवण क्षमता तपासून घेण्याची चाचणी करावी.<br>➢ हवामान अंदाजावर आधारित कृषिसल्ला व हवामानाच्या पूर्वानुमानाकरिता मेघदूत या मोबाइल ॲपचा वापर करावा. विजेच्या अंदाजाच्या पूर्वानुमानाकरिता दामिनी मोबाइल ॲपचा वापर करावा.</td></tr>
</table>

## हवामान आधारित कृषि सल्ला

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र,
## कृषि विज्ञान केंद्र , मोहोळ , सोलापूर.

दूरध्वनी –(०२१८९) २३३००१ ईमेल-damu.kvkmohol@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | ❖ **शेतकरी बांधवांनी मेघ गर्जना व वीजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने पुढील प्रमाणे काळजी घ्यावी.**<br>➢ मेघ गर्जना व वीजांचा कडकडाट वादळीवारा ची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागांना तसेच भाजीपाला पिकांना जोरदार वाऱ्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागांना तसेच भाजीपाला पिकांना जोरदार वाऱ्यामुळे झाडे पडू नये म्हणून काठी/ बांबू च्या सहहयाने आधार द्यावा.<br>➢ शेती मध्ये काम करत असल्यास त्वरित सुरक्षित ठिकाणी जावे. झाडाखाली थांबणे टाळावे.<br>➢ जनावरे तलाव नदी किंवा इतर पाण्याच्या ठिकाणी असतील तर त्वरित बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी ठेवावे.<br>➢ जनावरे ट्रॅक्टर किंवा इतर धातूंच्या वस्तूंपासून लांब बांधावीत.<br>➢ काढणी केलेला शेती माल प्लास्टीक च्या शिटणे झाकावा.<br>➢ विद्युत उपकरणे, विद्युत तारा यांचा संपर्क टाळावा.<br>➢ जनावरांना झाडाखाली जमा होऊ देऊ नये. |
| संदेश | | खरीप नियोजनाकरिता पेरणी पूर्व कामे सुरू करावीत ( उगवण क्षमता तपासणे , जमिनीतील अन्नद्रव्य तपासणे दर्जेदार व प्रमाणित बियाणाचे नियोजन करणे, मशागतीची कामे करणे ) |
| सोयाबीन | पूर्वमशागत | **जमीन निवड:** मध्यम काळी पोयट्याची, चांगली निचरा होणारी.<br>**पूर्वमशागत:** एक नांगरट, दोन कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन भुसभूशीत करावी. |
| तूर | पूर्वमशागत | **जमीन निवड:** मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन तूर पिकाकरिता योग्य असते. चोपण, पाणथळ जमिनीत तूर चांगली येत नाही. कसदार भुशभुशीत, पोयट्याच्या जमिनीत सुद्धा तूर चांगली येते. जमिनीत स्फुरद, कॅल्शिअम, गंधक या द्रव्यांची कमतरता नसावी. साधारणत: ६.५ ते ७.५ सामू असलेली जमीन या पिकास योग्य असते.<br>**पूर्वमशागत:** मान्सूनचा पाऊस झाल्यावर वाफसा येताच कुळवाची पाळी देऊन काडी कचरा सस्वच्छ वेचून जमीन पेरणीसाठी तयार ठेवावी. याच वेळी हेक्टरी ०५ टन चांगले कुजलेले शेणखत टाकावे. |
| मूग / उडीद | | **जमीन निवड:** मध्यम ते भारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन आवश्यक असते.<br>पाणी साचून राहणारी, क्षारपड, चोपण किंवा अत्यंत हलकी जमीन टाळावी.<br>**पूर्वमशागत:** मान्सूनचा पाऊस झाल्यावर वाफसा येताच कुळवाची पाळी देऊन काडी कचरा सस्वच्छ वेचून जमीन पेरणीसाठी तयार ठेवावी. याच वेळी हेक्टरी ०५ टन चांगले कुजलेले शेणखत टाकावे. |
| मका | पूर्वमशागत | **जमीन निवड:** मध्यम ते भारी, खोल, रेतीयुक्त, उत्तम निचऱ्याची विशेषतः नदीकाठची गाळाची जमीन फारच उत्तम.<br>**पूर्वमशागत:** एक खोल नांगरट, २-३ कुळवाच्या पाळ्या देऊन २० ते २५ गाड्या प्रती हेक्टरी शेणखत/कंपोस्ट खत यांचवेळी शेतात मिसळून घ्यावे. हिरवळीचे खत गाडले असल्यास शेणखत/कंपोस्ट खतांची जरूरी नसते. |
| सूर्यफूल | | **जमीन निवड:** सूर्यफूल लागवडीसाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी मध्यम ते भारी जमीन निवडावी. आम्लयुक्त आणि पाणथळ जमिनीत हे पीक चांगले येत नाही.<br>**पूर्वमशागत:** एक खोल नांगरट, २-३ कुळवाच्या पाळ्या देऊन २० ते २५ गाड्या प्रती हेक्टरी शेणखत/कंपोस्ट खत यांचवेळी शेतात मिसळून घ्यावे. |
| ऊस | वाढीची अवस्था | मे महिन्यामध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ९.२४ प्रति दिवस एवढा असतो ऊस पिकास दररोज ९.३३ लिटर पाण्याची आवश्यकता असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज २ तास २० मिनिटे चालवावा.<br>**पिक संरक्षण**<br>**हुमणी :** वळवाचा पहिला पाऊस झाल्यावर हुमणीचे भुंगेरे सायंकाळी बाभूळ, कडूनिंब, व बोर या झाडांवर जमा होतात. अगोदर मादी भुंगेरे व त्यानंतर नर भुंगेरे जमिनीतून बाहेर पडतात. या झाडांवर बसून ते झाडांचा पाला खातात. अश्या झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भूंगेरे गोळा करून रॉकेल मिश्रित पाण्यात टाकून त्यांचा नाश करावा. |
| डाळिंब | वाढीची अवस्था | डाळिंब बागेत पहिल्या पावसानंतर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून इमामेक्टिन बेंझोएट ५ % एस जी २ ग्रॅम प्रती |

# हवामान आधारित कृषि सल्ला

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र , मोहोळ , सोलापूर.

दूरध्वनी –(०२१८९) २३३००१ ईमेल-damu.kvkmohol@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | लिटर प्रोपीकोनाझोल २५ % इसी २ मिली प्रती लिटर पाणी यांची एकत्रित ड्रेंचिंग केल्याने खोड किडा व मर रोगाची बुरशी यांचा प्रादुर्भाव व झाडावरील सच्छिद्रता कमी करता येते.<br>डाळिंब बागेस शक्यतो पाणी सकाळी किंवा संध्याकाळी द्यावे. जमिनीत पुरेसा ओलावा राहील याची दक्षता घ्यावी. जेणेकरून उष्णतेच्या लाटेचा फुलांवर व फळांवर होणारा परिणाम टाळता येईल. |
| केळी | वाढीची अवस्था | तुरळक ठिकाणी मेघ गर्जना, विजांचा कडकडाट सोसाट्याच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या केळी घडांची त्वरित काढणी करावी व सुरक्षित ठिकाणी ठेवावे. केळी बागेतील वजनाने मोठ्या असलेल्या घडांची झाडे पडु शकतात. केळी बागेतील झाडे पडू नयेत म्हणून व वजनाने मोठ्या असलेल्या घडास गरजेप्रमाणे बांबूचे किंवा पॉलीप्रोपेलीनच्या पट्यांच्या सहयाने झाडांना / घडाना आधार/ टेकू द्यावा. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांच्या कडकडाटसह पाऊसाची शक्यता असल्याने जनावारांना सुरक्षित ठिकाणी बांधावे.<br>वातावरणातील उष्णता वाढल्यामुळे जनावरांच्या शरीराचे तापमान वाढते व हे तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी जनावरे जास्त पाणी पितात व कमी चारा किंवा खाद्य खातात. याचा एकूणच जनावरांच्या वाढीवर, प्रजननावर व उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे पुढील नुकसान टाळण्यासाठी उन्हाळ्यात जनावरांची पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी.<br>१) वाढत्या तापमानामुळे गाभण जनावरे बाहेर चरावयास नेऊ नये. विशेषतः उष्ण भागात गाई म्हशीच्या अंगावर गोणपाट टाकून पाणी टाकावे.<br>२) जनावरांचा गोठा थंड जागी किंवा झाडाखाली बांधावा. गोठ्याच्या छपरावर गवत , पाला, पाचोळा, नारळाच्या झावळ्या टाकून पाणी शिंपडावे त्यामुळे गोठा थंड राहतो.<br>३) उन्हामध्ये जाणारांना ३-४ वेळा थंड व स्वच्छ पाणी पाजावे. गोठ्यात पाण्याची स्वतंत्र सुविधा केलेली असल्यास पाण्याचे भांडे सावलीत असावे व भांडे मुख्यत: माती किंवा सिमेंटपासून बनवलेले असावे जेणेकरून त्यात पाणी दिवसभर थंड राहील. |

स्त्रोत :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान:विभागीय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर.

ठिकाण :कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, सोलापूर.
दिनांक : २६ मे २०२३

स्वाक्षरीत
प्रमुख अन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-जिल्हा कृषि हवामान केंद्र,
कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, सोलापूर.